Topic No-4

# सामाजिक - कायदेशिर मुद्दे / समस्या
## Socio - Legal Issuess

* प्रस्तावणा :-

आज संपुर्ण विश्वात सामाजिक समस्या या सर्वाधिक स्वरुपात भेडसावत आहेत. कलमानुसार समस्यांचे स्वरुप ही बदलत चालले आहे. औद्योगिकिकरण, आधुनिकिकरण, नागनिकिकरण या प्रक्रीयांमधुनच अनेक प्रश्न, समस्या, सामाजिक मुद्दे, वादाचे मुद्दे निर्माण झालेले आहेत. यापैकी सामाजिक व वैधानिक म्हणजे कायदा या क्षेत्राशी संबंधीत आहे. या संबंधीत असणारे दोन महत्वाचे मुद्दे म्हणजे मानवी हक्क व सायबर गुन्हेगारी होय. या दोन्ही मुद्यांचा अभ्यास या प्रकारामध्ये करावयाचा आहे. तो पुढील प्रमाणे-

## A) मानवी हक्क - इतिहास, भारतीयराज्यघटनेतील मुलभूत हक्क
### Human Rights: History, Fundamental Rights in India Constitution.

* प्रस्तावणा :-

समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानव या नात्याने जन्मापासूनच स्वाभाविकपणे प्राप्त होणारे हक्क म्हणजे मानवी हक्क होय. मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे एक अविभाज्य भाग आहेत. प्रत्येक व्यक्तीला मनुष्य प्राणी या नात्याने ते हक्क नैसर्गिकरित्या प्राप्त झाले आहेत. म्हणून मानवी हक्कांशिवाय कोणत्याही व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करुन घेणे शक्य होणार नाही. त्याबरोबरच चांगल्या प्रकारचे जीवनही जगणे शक्य होणार नाही. मानवी हक्क / विकास यांचे अत्यंत जवळचे संबंध असतात. सर्वसामान्य लोकांमध्ये मानवी

Scanned with CamScanner

हक्कांबद्दल जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

## * मानवी हक्क अर्थ व स्वरूप :-

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. मनुष्याच्या असंख्य गरजा त्याला समाजातच राहून सामाजिक नियमनाच्या आधारे पुर्ण कराव्या लागतात. सामाजिक जीवनात व्यक्तीला काही विशेष सवलती दिल्या जातात. त्यालाच हक्क म्हटले आहे.

## * हक्क म्हणजे काय ?

सामाजिक जीवनात व्यक्तीला तीच्या सर्वांगीन विकासासाठी समाज व राज्य यांनी प्राप्त करुन दिलेली संधी व सवलत म्हणजे हक्क होय.

## * मानवी हक्क म्हणजे काय ?

मानवी हक्क हे मानवाशी संबंधीत असतात. व्यक्तीला आपले जीवन किमाने सुखाने व आनंददायीपणे जगण्याच्या आपल्या नैतीक मागणी प्रति नैतिक हमी देण्याचे काम मानवी हक्क करतात. हक्क हा शब्द वापर कायदा मिळवणे. त्यासाठी प्राप्त असणे ह्या अर्थाने वापरला जातो. 18 व्या शतकात मानवी हक्क या संकल्पनेसाठी नैसर्गिक स्वाभाविक, अदये निर्धारित इ. शब्दांचा वापर केला जात होता. परंतू संयुक्त राष्ट्र संघाच्या 1948 च्या जाहिरणाम्यामध्ये मानवी हक्क ही संकल्पना वापरण्यात आली.

## * व्याख्या :-

① रॅंडम हाऊस विश्वकोश :-

मानवी हक्क किंवा मानवी अधिकार म्हणजे व्यक्ती जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार कि जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक आहेत.

② 1993 मानवी हक्क संरक्षण कायदा :-

मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे मानवी जीवन, मानवी स्वातंत्र्य, मानवी समता, व मानवी प्रतिष्ठा यांच्याशी संबंधीत असतात. भारतीय राज्यघटनेने त्यांच्या अमलबजावणीची केवळ खात्री दिली नाही तर त्यांचा समावेश भारतीय राज्यघटनेत करुन त्यांची अंमलबजावणी भारतीय न्यायालयाकडे सोपवली आहे.

## * मानवी हक्क म्हणजे :-

① मानवी हक्क हे नैतिक अधिकार आहेत. जे प्रत्येक मानवाला केवळ मानव या नात्याने प्राप्त झाले आहेत.

② मानवी हक्क हे व्यक्तीला माणुस म्हणून जन्मताच प्राप्त होत असतात.

③ मानवी हक्क हे नैसर्गिक स्वरुपाचे आहेत.

④ मानवी हक्क हे व्यक्तीला सन्मानेने जीवन जगण्यासाठी आवश्यक आहेत.

⑤ मानवी हक्क हे मानवाला व्यक्ती महत्व विकासासाठी आवश्यक आहेत.

⑥ मानवी हक्क हे इतर व्यक्ती राज्य व सत्ता यांच्या अत्याचारापासून संरक्षण करण्याचे कार्य करतात.

मानवी हक्क, जन्मताच मिळालेले हक्क आहेत. ते व्यक्तीच्या प्रगतीसाठी, विकासासाठी, मूल्यांची जोपासना करण्यासाठी आवश्यक आहेत.

Scanned with CamScanner

## * मानवी हक्क - इतिहास -

### * प्रस्तावना :-

मानवी हक्क हि संकल्पना २० व्या शतकात विशेषत: २ ऱ्या महायुद्धानंतर प्रत्यक्षात निर्माण झाली असली तरी मानवी हक्काच्या संकल्पनेचा उल्लेख अगदी प्राचिन काळापासून दिसून येत आहे. मानवी हक्क अधिकार संकल्पना कोणत्या पद्धतीने निर्माण होत गेली या सर्व बाबींचा इतिहास पुढील प्रमाणे

### A) प्राचिन कालखंड :-

प्राचिन कालखंडाचा कालावधी व्यापक व विस्तारीत असल्यामुळे या कालखंडातील मानवी हक्काचा इतिहास पुढील प्रमाणे काही विभागानुसार स्पष्ट करणे आवश्यक आहे.

#### ① ख्रिस्त पूर्व परंपरा :-

ख्रिस्त पूर्व ५३९ मध्ये पार्शियन साम्राज्याचा सम्राट सायरस याने बॅबिलोनवर विजय प्राप्त करुन "सायरस वृत्तीचिती" निर्मिती केली ही वृत्ती चिंतिन मानवी हक्काचा दस्तऐवजी म्हणून ओळखली जाते. या वृत्तीचीत्तीने अनेकांना गुलामगिरीतीन मुक्त करण्याचे कार्य केले.

#### ② सम्राट अशोकाची राजवट :-

प्राचिन भारतातील मौर्य साम्राज्यातील सम्राट अशोकाने आपल्या राजवटीत नागरी हक्कांची तत्वे प्रस्तापित केली अहिंसा सहिष्णुता, भुतदया, गुरुजनांचा आदर, मानवता ही तत्वे लागू केली यातील काही भाग अशोक स्वभावरनी देखील आला आहे.

Scanned with CamScanner

③ ग्रीक परंपरा :-

पाश्चात्य विचारसरणी ग्रीक व रोमन या देशातील तत्वे व्यक्तिंची भूमिका महत्व पूर्ण ठरलेली आहे. त्यांच्या तत्वज्ञानात आजच्या मानवी हक्क या अधुनिक विचाराची बीजे सापडतात. सॉक्रेटिस, प्लेटो, यांनी जो नैतीक कायदा स्पष्ट केला त्या नुसारच नागरीकांना स्वातंत्र्याचे व समानतेचे हक्क मिळाले.

④ रोमन परंपरा :-

प्राचिन रोममध्ये देखील नैतिक हक्कांची कल्पना पुढे चालू राहीली. रोमन परंपरेतील विचारवंत उल्मीमान व सिसेरो यांनी नैतीक हक्काची कल्पना विस्तारित केली.

प्राचिण कालखंडात वरीलप्रमाणे मनुष्याच्या हक्काविषयी ज्या कल्पना, विचार, मांडले गेले होते. ती एक मानवी हक्काची पार्श्वभूमिच होती.

B) मध्ययुगीन कालखंड :-

ह्या कालखंडात प्राचिण कालखंडातील नैसर्गिक कायद्याच्या सिद्धांताचे रुपांतर मध्ययुगात दैवी तत्वांवर करण्यात आले. पाश्चात्य विचारवंताने आपल्या विचारामधून मानवी हक्काच्या उत्क्रांतीस हातभार लावला. ह्युगो ग्रोशियस याने ~~१२~~ व्या शतकात प्रत्येक व्यक्तीच्या नैतीक हक्काच्या कल्पनेची ओळख करून दिली होब्ज, लॉक रुसो या तिघांना करार सिद्धांताचे प्रणेते म्हणून ओळखले जाते मानवी हक्क म्हणजे मुलभूत स्वरुपाचे आहेत. मनुष्य, मुक्त, समान, स्वातंत्र्य आहे. रुसो यांनी स्वातंत्र्य, समता बंधुता या संकल्पनांना महत्व दीले अशा प्रकारचे विचार स्पष्ठ करुन मानवी हक्कांचा पाया घालण्याचे काम या विचारवंतांनी केले.

Scanned with CamScanner

ⓒ आधुनिक कालखंड :-

20 व्या शतकापासून मानवी हक्कांच्या संकल्पनेचा मोठ्या प्रमाणात पुरस्कार करण्यात येवू लागला 1945 मध्ये 2 ऱ्या युद्धात जपानच्या हिरोसिमा/नागासाकी शहरावर अणुबॉंब वर्षाव करण्यात आला. लाखो लोक मारले गेले या घटनेची चर्चा जागतिक स्तरावर सुरु झाल्या संयुक्त राष्ट्र संघाने मानवी कृतीला आळा घालण्यासाठी मानवी हक्कांचे संरक्षण जतन व संवर्धन साधण्यासाठी मानवी हक्कांचा जाहिरनामा प्रसिद्ध केला होता 20 वे शतक हे मानवी हक्कांचे शतक मानले जाते.

मानवी हक्कांची ही संकल्पना ही पाश्च्यात विचारवंतांनी मानला दिलेली देणगी आहे. मानवी हक्क ही संकल्पना अत्यंत व्यापक आहे. हि घटना पुढील प्रमाणे-

① प्रत्येक व्यक्तिला जीवन, स्वातंत्र्य, मालमत्ता, याबाबत समान हक्कास मान्यता असणे.

② नागरीकांच्या सामान्य हक्कांचे जतन करणे.

③ कोणतेही राज्य, राष्ट्र, नागरिकांमध्ये राष्ट्रीयत्व लिंग धर्म भाषा आधारावर भेदभाव करणार नाही

④ व्यक्तिच्या सार्वजनिक खाजगी जीवनातील विश्वास वर्तनास मान्यता असणे.

Scanned with CamScanner

## * भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्क :-

*** प्रस्तावना :-**

भारतीय राज्यघटना निर्माण करताना या राज्यघटने मध्ये घटनाकारांनी मुलभूत हक्कांना विशेष महत्व दिले आहे. भारतीय राज्यघटनेत सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकिय न्याय प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. लोकांना विचार अभिव्यक्ती, विश्वास स्वातंत्र्य धर्म व संधीची समानता प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यापूर्वी सुमारे 17 महिने आगोदर भारत स्वातंत्र्य झाला. व त्यानंतर भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समिती निर्माण झाली भारताची राज्यघटना - 26 नोव्हेंबर 1949 रोजी तयार केली गेली. आणि त्यानंतर 26 जानेवारी 1950 रोजी संविधनावर आधारित असेल स्वातंत्र्य व सार्वभौम प्रजासत्ताक गनराज्य म्हणून आस्तित्वात आले.

## * भारतीय राज्यघटनेतील सहा मुलभूत हक्क :-

(1) समतेचा हक्क (कलम 14 ते 18) :-

विविध धर्म, जाती, भाषा, भारतीय समाजात लोकशाही मूल्ये सक्षम पणे रुजवण्याकरिता विविध भेदभावापासून दूर जाता सर्वांना समानतेच्या तत्वाच्या गुंफवण्या करिता समतेचा हक्क महत्वाचा आहे. समतेच्या अधिकारात पुढील समताचा समावेश आहे.

* (1) कायद्यासमोर समानता :- (कलम 14)

या हक्कानुसार कायद्या समोर सर्व समान आहेत राज्याचे कायदे सर्वांना समान लागू केले. त्यामध्ये धर्म जात, वंश, प्रांत इ आधारे भेदभाव केला जाणार नाही.

② सार्वजनिक ठिकाणी प्रवेशाचा समान हक्क :(क.15)
सार्वजनिक ठिकाणी प्रवेशाचा सर्वांना समान हक्क देण्यात आला. शाळा, मंदीर, पाणवठे, उपहार गृह, सर्व सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करण्यासाठी धर्म, जात, वंश या आधारे कोणत्याही भेदभाव केला जाणार नाही.

③ सार्वजनिक सेवेत समान संधी :-
सार्वजनिक सेवात किंवा नोकरीत कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान संधीचा हक्क देण्यात आल.

④ अस्पृशता नष्ट करणे - (कलम -17)
कलम 17 नूसार अस्पृशता नष्ट करुन अस्पृशता पालनास बंदी करण्यात आली. 1955 अस्पृशता निवारण कायदा अस्तित्वात आला.

⑤ पदव्यांचे संपुष्टीकरण - (कलम 18)
कोणत्याही प्रकाराचे किताब, पदव्या राज्यतर्फे दिले जाणार नाही. पदव्यांमुळे विषमता निर्माण होवू शकते.

② स्वातंत्र्याचा हक्क :- (कलम -19 ते 22)
भारतीय रा. घटनेत व्यक्तीच्या सर्वांगिण व्यक्तीमत्व विकासासाठी प्रथम 7 स्वातंत्र्याचे हक्क देण्यात आले होते. परंतु घटना दुरुस्ती मध्ये यातील संपत्तीचा हक्क हा वगळण्यात आला.

① भाषण व मतप्रदर्शन स्वातंत्र्य :
विचारांची देवाण-घेवाण, मुक्ती चर्चा विचार भाषणाद्वारे मांडण्याचा हक्क देण्यात आला

Scanned with CamScanner

② शांतता पूर्वक व शस्त्र ने बाळगता एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य:-
राज्यातील विविध समस्या इ. विचार मांडणे जाणिव जागृतीसाठी एकत्र जमने सभा, मिरवणुक काढणे याबाबतचा हक्क दिला आहे.

③ संस्था किंवा संघटना स्थापणा करण्याचे स्वातंत्र्य:-
प्रत्येकाला सामाजिक आर्थिक, राजकिय, औद्योगिक इ. संस्था व संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.

④ संचार करण्याचे स्वातंत्र्य:-
प्रत्येकाला भारतात कोठेही संचार करण्याचे स्वातंत्र्य या हक्कानुसार दिले आहे.

⑤ भारतात कुठेही वास्तव करण्याचे स्वातंत्र्य:-
नोकरी, शिक्षण, व्यवसाय, व्यापार, पर्यटन अशा विविध कारणांसाठी देशात कोठेही वास्तव तात्पुरते किंवा कायमस्वरुपाचे करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

⑥ व्यापार व व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य:-
प्रत्येक नागरीकाला त्याच्या आवडीनुसार, पात्रतेनुसार व्यावसाय करण्याचा हक्क दिला आहे. त्यामुळे जातीयतेचे व्यावसाय निवडीवरील बंधन नष्ट झाले.

या शिवाय कलम २० नुसार अपराधी व्यक्तिस गुन्हा संदर्भातील संरक्षण देण्यात आले. कलम २१ नुसार जीविताचा आणि स्वातंत्र्याचा हक्क दिला आहे. आणि कलम २२ नुसर बेकायदेशीर अटक व कैद विरुद्चा संरक्षणाचा हक्क आहे.

Scanned with CamScanner

## (3) शोषणा विरुद्धचा हक्क :- (कलम 23 ते 24)

कलम 23 नुसार अनैतिक देहव्यापार, वेठबिगार सक्तीने काम करुन घेणे मानसांची खरेदी-विक्री गुलामगिरीस प्रतिबंध करण्यात आला असून त्यांनी संरक्षण देण्याचा हक्क प्रत्येकास दिला आहे तसेच कलम 24 नुसार 14 वर्षा खालील मुलांना कारखाने किंवा अन्य जोखमिच्या ठिकाणी कामावर ठेवण्यात मनाई केली आहे.

## (4) धार्मिक स्वातंत्र्य हक्क :- (कलम 25 ते 28)

42 व्या घटना दुरुस्तीनुसार भारतात हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे. हे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार कोणत्याही विशिष्ट धर्म हा राष्ट्राचा धर्म मानला नाही. धर्म ही प्रत्येक नागरिकाची खाजगी बाब मानण्यात आली आहे.

## (5) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम 29 व 30)

भारतातील सर्व धार्मीच्या, संप्रदायाच्या वर्गाच्या नागरीकांना सांस्कृतीक व शैक्षणिक विकासाची संधी प्राप्त व्हावी म्हणून हा हक्क दिला आहे. भारतीय प्रदेशात किंवा त्यांच्या कोणत्याही भागात वास्तव्य करण्याचा नागरिकांच्या कोणत्याही विभागाला स्वतःच्या स्वातंत्र्य भाषा, लिपी, किंवा संस्कृती अबाधित राखण्याचा हक्क तसेच धार्मिक, भाषीक अशा सर्व प्रकारच्या अल्पसंख्यांकांना स्वतःच्या पसंतीशिवाय शिक्षण संस्था स्थापन करण्याचा व त्या चालवण्याचा हक्क राज्य घटनेने दिला आहे.

## (6) घटनात्मक उपायांचा हक्क (कलम 32) :-

या हक्कानुसार प्रत्येक व्यक्तीला

Scanned with CamScanner

आपल्या हक्कांवर अतिक्रमण झाल्यास हक्कांच्या संरक्षणासाठी दाद मागता येते. व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी घटनात्मक उपाययोजनेचे पुढील पाच मार्ग सांगितले आहेत.

① बंदी प्रत्यक्षीकरण :-
अटक केल्यावर व्यक्तीची अटक कायदेशीर की नाही हे अटकेतील व्यक्तीला न्यायालयात हजर करण्याचा आदेश न्यायालय देऊ शकते.

② परमादेश :-
एखाद्या शासकिय अधिकाऱ्याने कर्तव्यात कसूर केल्याने मुलभूत हक्कात अडथळा येत असेल तर संबंधित अधिकाऱ्यास ते कर्तव्य पार पाडण्याचा आदेश न्यायालयात काढण्यात येते.

③ प्रतिषेध :-
न्यायालयातील कामकाज चालत नसेल त्यामुळे न्याय मिळवणे अवघड जात असेल तर त्या संबंधीत दाद मागता येते.

④ अधिकार पृच्छा :-
जेव्हा एखादा अधिकारी त्याच्या विशिष्ट अधिकाराचा वापर करतो ~~करतो~~. पण प्रत्यक्षात त्याला तो अधिकार नसेल तर त्याने वापरलेल्या अधिकाराबाबत स्पष्टीकरण मागता येते.

⑤ उत्प्रेशन :-
कनिष्ट न्यायालयातील खटला काहि विशिष्ट्य कारणासाठी वरिष्ट न्यायालयात चालविण्यासाठीचा अर्ज व्यक्तिला करता येतो.

* मानवी हक्काची सनद :-

10 डिसेंबर 1948 रोजी संयुक्त राष्ट्र या संघटनेने 'मानवी हक्काची सनद' स्वीकारली राज्यघटने मुलभूत हक्कांविषयी तरतुदींचा समावेश करताना भारताच्या घटना समितीने मानवी हक्काची सनद विचाराात घेतली त्यानुसार प्रत्येक व्यक्ती जन्मत: स्वतंत्र असते. प्रत्येकाला जीविताचा स्वांतत्र्याचा सुरक्षिततेचा अधिकार आहे. मानवी हक्क व्यक्तीला जन्माने प्राप्त होतात. ते नाकारण्याचा अधिकार कोणाला नसतो मानवी हक्काच्या सनदेतील विविध हक्कांचा स्वीकार जगातील सर्व राष्ट्रांनी करावा असा संयुक्त राष्ट्राचा आग्रह आहे. मानवी हक्काबाबत जागरुकता वाढावी म्हणून साजरा केला जातो.

B) * सायबर गुन्हेगारी :-

* प्रस्तावणा :-

आज आपण आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे चालत आहेत. आपले दैनंदिन जीवन यावर अवलंबुन असते आजकाल इंटरनेट हे सर्वसामान्य नाव झाले आहे इंटरनेट मध्ये आपल्याला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींचा समावेश आहे म्हणून लोक त्याचा वापर करीत आहेत. आणि त्यावर अवलंबुन आहेत. इंटरनेटचा वापर दिवसेंदिवस वाढत असत. जग छोट आहे आणि लोक जवळ येत आहेत गेल्या काही दशकात माहिती तंत्रज्ञान आणि विद्युत भारित प्रचारमाध्यमे यांचा विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. या विकासाचा प्रारंभ इ.स. 1980 नंतर झाला त्याचा परिणाम संगणकाशी संबंधीत अनेक गुन्हे आकाराला येण्यात झाला सायबर गुन्हा ही संज्ञा संगणक, इंटरनेटशी संबंधीत असणाऱ्या व प्रत्यक्षात

संगणकाच्या प्रामुख्याने वापर असणाऱ्या गुन्हाला उद्देशून योजली जाते. म्हणजेच संगणक व इंटरनेट द्वारे किंवा संगणकाच्या माध्यमातून वापर करून जे गुन्हे घडतात त्यानाच सर्वसाधारण पणे सायबर गुन्हा असे संबोधले जाते.

इंटरनेट आणि सोशल मिडीयाने आपल्या दैनंदीन जीवनात मोठ्या प्रमाणात आक्रमण केले आहे. इंटरनेटच्या सकारात्मक वापराबरोबरच दुष्प्रवृत्ती द्वारे केला जाणारा दुरुपयोग सर्वसामान्यांपासून ते अगदी राष्ट्रीय पातळीपर्यंत जीवन विस्कळीत करू शकतात. इंटरनेट द्वारे केल्या जाणाऱ्या गैरवापरास 'सायबर क्राईम' म्हटले जाते.

* सायबर गुन्हा - व्याख्या

① संगणक, मोबाईल किंवा इंटरनेटसह इलेक्ट्रॉनिक आणि टेलिकम्युनीकेशन नेटवर्कच्या गैरवापर करून एखादी व्यक्ती समुहाला शारिरीक किंवा मानसिक हानी पोहचवण्यासाठी किंवा त्याची बदनामी करण्यासाठी गुन्हेगारी उद्देशाने केलेले कृत्त म्हणजे सायबर गुन्हा होय.

② प्रा. एन. व्ही. परांजपे :-
यांनी त्यांच्या इंग्जी भाषेतून लिहलेल्या गुन्हेगारीशास्त्र व दंडशास्त्र यापुस्तकात सायबर गुन्हाची व्याख्या दिली आहे. त्यांच्या मते ("सायबर गुन्हेगारी म्हणजे असा गुन्हा की, जो संगणकाचा वापर करून केला जातो. या गुन्हात संगणकाचा वापर माध्यम म्हणून, लक्ष्य साध्य करण्यासाठी म्हणून, गुन्हा ~~अपराध~~ अपराध करण्याचे साधन म्हणून केला जातो.

③ सायबर गुन्हेगारी म्हणजे एक असे बेकायदेशीर कृत्य कि, ज्यामध्ये संगणक व इंटरनेटच्या वापर हत्यार व लक्ष्य म्हणून केला जातो.

Scanned with CamScanner

## * सायबर गुन्हेगारीचे प्रकार :-

1. माहिती चोरी करणे
2. सायबर स्टॉकिंग (पाठलाग करणे)
3. हॅकिंग
4. व्हायरस अटॅक
5. पोर्नोग्राफी (अश्लील मजकूर)

## * सायबर गुन्हेगारीची कारणे :-

### * प्रस्तावना :-

भारतात तंत्रज्ञानाची प्रगती अत्यंत वेगाने होत आहे. या प्रगतीबरोबरच सायबर गुन्हेगारी त्याच्या बरोबरच देखील वाढत चालल्या आहेत. Internet च्या मदतीने लोकांची फसवणूक केली जाते. महत्वाचा डेटा चोरी केला जात आहे. विशेषतः स्त्रियांना ब्लॅकमेल केला जात आहे. संगणक व इंटरनेटच्या गैरवापरातून अशा प्रकारचे सायबर गुन्हे घडून येत आहे. सायबर गुन्हेगारी निर्माण होण्याची कारणे पुढील प्रमाणे.

1. **सहज / सुलभ प्रवेश :-**

आज तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संगणक प्रणाली मध्ये ~~मान्यती~~ मान्यता नसताना प्रवेश करणे अत्यंत सुलभ झालेले आहे. संगणकामध्ये असा छुपा प्रवेश करून माहिती चोरी करणे वायरस पसरवणे धमकीचे मेसेज देणे अशा प्रकारचे गुन्हे केले जात आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सहज प्रवेश करता येत असल्याने सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे.

2. **लहान जागेत अधिक डेटा साठवण्यासाठी क्षमता :-**

संगणक मोबाईल अशा वस्तूमध्ये

अतिशय लहान जागेत महत्वाचा डेटा माहिती साठवून ठेवणे हे आजच्या तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य आहे. परंतू इतर लोकांना अशा ठिकाणाहुन ती माहिती चोरी करणे स्वतःच्या फायद्यासाठी वापरणे अत्यंत सुलभ झाले आहे.

③ निष्काळजी पणा :-

निष्काळजीपणा हे मानवी वर्तनाचे वैशिष्ट्य आहे. संगणक, मोबाईल, वापरतांना त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यास संगणकाची व्यवस्था, सुरक्षा धोक्यात येऊ शकते. या निष्काळजीपणाचा फायदा संगणकीय गुन्हेगार घेतात तिथे अनैतीक प्रवेश करतात. त्याचा व्यक्तीगत स्वार्थासाठी गैरवापर करतात त्यामुळे संगणक, डिजीटल वस्तू वापरतांना निष्काळजी पणा करू नये.

④ पुरावा नष्ट करणे :-

संगणक मोबाईल - Internet या ठिकाणी असणारे पुरावे क्षणार्धात नष्ट करता येतात. त्यामुळे अशा ठिकाणी गुन्हेगार गुन्हा करतात. त्यामुळे संगणकीय गुन्हा करणाऱ्यांचा शोध घेणे तपास यंत्रणेला अवघड जाते.

⑤ ज्ञानाचा गैरवापर :-

काही व्यक्ती आपल्या बुद्धीच्या जोरावर संगणक, Intevent, online व्यवहार या ठिकाणी व्यक्तीगत स्वार्थासाठी अधिक पैसा मिळविण्यासाठी उपलब्ध तंत्रज्ञानाचा गैरवापर करतात. यातून समोरच्या व्यक्ती नुकसान झाला तरी त्यांना फारसे देणे, घेणे, घेणसते.

उदा ; बँक खात्यातून online

⑥ सुड / बदला घेणे :-

आज आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून एखादया व्यक्तीची बदनामी करण्यासाठी सायबर व्यवस्थेचा

वापर केला जात आहे. युकिचे मेसेज देणे, आपत्ती पसरवणे अश्लिल फोटो टाकणे अशा स्वरूपामध्ये एखाद्या व्यक्तीची महिलांची बदनामी केली जाते. अशा घटना एखाद्याला व्यक्तीला सूड / बदला घेण्यासाठी केल्या जातात.

(7) आर्थिक महत्वाकांक्षा पैसा हा सर्वस्व :-

काही लोक पैसा हे सर्वस्व मानून श्रीमंत होण्यासाठी संगणकीय, इंटरनेटचा वापर व्यवस्थांचा गैरवापर करतात.

उदा; माहितीची अफरा-तफर करणे, सिस्टीम हॅक करणे अशा प्रकारच्या घटना करुन कमी कालावधीत अधिक पैसा देपून श्रीमंत बनण्याचा प्रयत्न करतात. याचाच अर्थ आपल्या आर्थिक महत्वकांक्षेसाठी व अधिक पैसे मिळवण्यासाठी संगणक, इंटरनेट यांचा गैरवापर करतात. परिणामी सायबर गुन्हेगारीच्या घटना वाढत चालले आहेत.

(8) प्रसिद्धीचा हव्यास :-

आज समाजामध्ये तरुण, युवक, युवती महिला यांना आपली छायाचित्रे, व्हिडीओ सोशल मिडिया वरती प्रसारित करून जास्तीत जास्त माहिती प्रसिद्ध करुन प्रसिद्धी मिळवणे, कमेन्ट्स मिळवणे अशा प्रकारची सवय अनेकांना लागल्याचे निदर्शनास येते. तज्ञ व्यक्तिंकडून, व्हिडीओ, फोटो यांचा गैरवापर केला जात आहे. अश्लिल फोटो तयार करणे, व्हिडीओ तयार करणे व त्या आधारे ब्लॅकमेल करणे अशा घटना घडून येत आहेत.

आज इंटरनेटच्या माध्यमातून बेकायदेशीर पणे सायबर गुन्हेगारीच्या घटना अधिक प्रमाणात केल्या जात आहेत. अशा घटना घडण्यासाठी

Scanned with CamScanner

सायबर गुन्हेगारी वाढण्यासाठी वरिल प्रमाणे काही कारणे जबाबदार आहेत.

## * सायबर गुन्हेगारीवरील उपाययोजना :-

सायबर गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना दोन प्रकारामध्ये सांगता येतील त्या उपाययोजना म्हणजे -

① कायदेशीर उपाय योजना

② इतर उपाययोजना

### *① कायदेशीर उपाययोजना :-

सायबर गुन्हे व गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी भारत सरकारने केलेल्या कायदेशीर उपाययोजना पुढील प्रमाणे -

### ① माहिती तंत्रज्ञान कायदा (सन 2000):-

भारतातील संगणक यंत्रणेचा वाढता वापर व प्रसार यामुळे सायबर गुन्हात वाढ होवू लागली. संगणक क्षेत्रातील फसवणुक गुन्हेगारी रोखण्यासाठी एखादा स्वतंत्र्य कायदा असावा अशी सरकाला जाणिव झाली. त्याचा परिणाम स- 2000 "माहिती तंत्रज्ञान कायदा" मंजूर करण्यात आला या कायद्यानुसार संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या गुन्हांना शिक्षा देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. या कायद्यातील न्यायालयीन तरतुदी पुढील प्रमाणे :-

① कलम 43 :- दुसऱ्याच्या संगणकात बेकायदेशीर प्रवेश करण्यास मनाई.

② कलम 44 :- मागवलेली माहिती न पाठवल्यास आर्थिक दंड.

③ कलम 65 :- संगणकातील दस्त ऐवजात फेरफार किंवा बदल केल्यास शिक्षेची तरतुद

Scanned with CamScanner

④ कलम 66 :- संगणकातील डेटा मध्ये हॅक करण्याचा प्रयत्न केल्यास शिक्षेची तरतुद.

⑤ संगणक व इलेक्ट्रॉनिक, गॅजेट मधुन चोरी केलेल्या माहितीचा गैरवापर केल्यास शिक्षा.

⑥ एखाद्याचा पासवर्ड चोरी करणे.

⑦ दहशत वादासाठी सायबर वापरणे

⑧ अश्लिल माहिती व छायाचित्र माहिती प्रसारित करणा--यांस शिक्षा

⑨ संगणकातील खाजगी माहितीचा भंग केल्यास शिक्षा

या कायद्यानुसार वरिल प्रकारचा कोणताही गुन्हा केल्यास स्वरुपानुसार शिक्षा केली जात आहे.

② राष्ट्रीय सायबर सुरक्षानिती :-

भारताच्या केंद्रीय संचार व सुचना अधिकारी मंत्रालयाकडून दोन जुलै 2013 (2/7/2013) रोजी "राष्ट्रीय सायबर सुरक्षा निती" हा कायदा लागु करण्यात आलेल्या आहे सायबर सुरक्षा मजबुत करणे. सायबर आक्रमणाचा बचाव करणे सायबर गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे. यासाठी हा कायदा करण्यात आलेला आहे.

③ सुधारित माहिती तंत्रज्ञान कायदा 2008 :-

सन 2000 च्या माहिती तंत्रज्ञान कायद्यातील काहि कमतरता लक्षात घेवून सरकारने 2008 मध्ये सुधारित माहिती तंत्रज्ञान कायदा मंजूर केला आहे. यानुसार महिलांची अश्लिल दृष्ये प्रदर्शित करणे, अभद्र बोलणे, वाईट संदेश पाठवणे अपमानित करणे या वर्तनासाठी शिक्षा होवू शकते.

वरिल प्रमाणे सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी भारत सरकारकडून कायदेशीर उपाययोजना करण्यात आलेली आहेत.

Scanned with CamScanner

ब इतर उपाययोजना :-

सायबर गुन्हे हे प्रामुख्याने संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून निर्माण होत असतात. यासाठी कायदेशीर उपायाबरोबरच संगणक, इंटरनेट, मोबाईल इतर साधने वापरत विशिष्ट्य प्रकारची खबरदारी दक्षता घेणे आवश्यक आहे. अशा उपाययोजना पुढील प्रमाणे

1. आपली वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्ती किंवा वेबसाईट डाऊनलोड करू नये.
2. आपले पासवर्ड वेळोवेळी बदलावेत.
3. अनोळखी मेसेज, इमेल, उघडू नये.
4. इंटरनेटच्या सुरक्षेसाठी अन्टीव्हायरस वापरावा.
5. सुरक्षित संकेत स्थळावरती online बँकींग व्यवहार करावेत.
6. Online व्यवहार केल्यानंतर लगेच लॉग आऊट व्हावे.
7. ऑनलाईन शॉपिंग खात्रीशिर संकेत स्थळावरून करावी.
8. कोणत्याही व्यापारी संस्था, विक्रेते यांच्या जाहिरातींना बळी पडू नये.
9. आपला पासवर्ड कोणालाही देवू नये.
10. अनोळखया व्यक्तींबरोबर संवाद साधताना सुरक्षितता बाळगावी कोणाबद्दलही अपेक्षार्ह पोस्ट टाकू नये.
11. द्वेश, ताण-तणाव, अफवा निर्माण होईल अशा स्वरूपाचे संदेश पोस्ट व फॉरवर्ड करू नये.

अशा उपाययोजनांचा स्वीकार केल्यास सायबर गुन्हेगारीच्या घटना कमी होण्यास मदत होईल.

* सारांश :-

आधुनिक काळात सायबर गुन्हेगारीच्या समस्येचे प्रमाण वाढत चालले आहे. व सुरक्षितता व सावध पणे इंटरनेटचा वापर करणे काळाची गरज आहे. सायबर गुन्हेगारीबाबत सतर्क, जागृत असणे हे देखील महत्वाचे आहे.

Scanned with CamScanner

प्रश्न -

* दिर्घोत्तरी प्रश्न

(1) मानवी हक्क म्हणजे काय? मानवी हक्काचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

(2) मानवी हक्काचा अर्थ सांगुन मानवी हक्काचा इतिहास आढावा विषय करा.

(3) भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्कांचे सविस्तर स्पष्टीकरण लिहा.

(4) सायबर गुन्हेगारीमध्ये समाविष्ट असलेल्या गुन्हांविषयी माहिती लिहा.

(5) सायबर गुन्हेगारीची कारणे विशद करा?

(6) सायबर गुन्हेगारी विषयक प्रतिबंधात्मक कायदेशीर उपाय विशद करा.

* टिपा लिहा.

(1) मानवी हक्क

(2) मानवी हक्कांचा इतिहास

(3) भारतीय राज्य घटनेतील मुलभूत हक्क

(4) सायबर गुन्हेगारी विरोधात कायदेशीर उपाय योजना

(5) सायबर गुन्हेगारीचा अर्थ, कारणे.

—***—

Scanned with CamScanner